# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ६३७/२०२२

तक्रारकर्ता, श्री.शंकर बाळकृष्ण यादव
मातोश्री निवास, मु.पो.कासार्डे, उत्तर दक्षिण गांवठाण
प्राथमिक आरोग्य केंद्र शेजारी
ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग ४१६ ८०१

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय लांजा, भूमि अभिलेख भवन लांजा ता.लांजा, जि.रत्नागिरी ४१६ ७०१

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय लांजा, भूमि अभिलेख भवन लांजा ता.लांजा, जि.रत्नागिरी ४१६ ७०१

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १७/६/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ३१/३/२०२१ | ----- | ७/१०/२०२१ | १/१२/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.१५/२/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " परिपूर्ण माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १७/६/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" गाव पुनस येथील गट नंबर ४३४ हि बिनशेती जमिन श्रीम.पार्वती दादु कुंभार, व इतर यांनी सदर गट नंबरची शासकीय मोजणी करिता केलेल्या अर्जाची व त्यासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्राची नक्कल सही/शिक्क्यानिशी माहिती मिळण्याबाबत व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१/१२/२०२१ रोजी, *"अपिलकार श्री.शंकर बाळकृष्ण यादव यांचे दिनांक ९/४/२०२१ व २/९/२०२१ रोजीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अंतर्गत अर्जातील मुद्दांचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक उप अधीक्षक भूमी अभिलेख लांजा श्री.डी.वाय.भाटकर यांनी कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखाची माहिती अपिलकार यांना या कार्यालयाकडील १५ दिवसांत विनामूल्य पुरविणेत यावी."* असा निर्णय दिलेला आहे.

सुनावणीची सूचना देऊनही सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत.

नस्तीवरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रथम अपील प्राधिकारी यांनी त्यांचे दिनांक १/१२/२०२१ रोजीचे निर्णयानुसार तक्रारकर्ता यांना १५ दिवसात विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले होते. तथापि अद्यापपर्यत तक्रारकर्ता यांना माहिती दिल्याचे दिसून येत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.दत्तात्रय भाटकर, मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमी अभिलेख लांजा यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ३१/३/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन प्रथम अपील निर्णयानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दि.४/८/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

राज्य माहिती आयोग

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १७ जून, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.दत्तात्रय भाटकर, मुख्यालय सहायक --
- **यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक,
उप अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय लांजा, भूमि अभिलेख भवन लांजा
ता.लांजा, जि.रत्नागिरी ४१६ ७०१ **<u>यांचेमार्फत रवाना.</u>**